सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
### मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

फो.नं. ०२०-२६१२२०७६
email: ddtp.ho@maharashtra.gov.in
email: dirtpvd.pune@ maharashtra.gov.in
email: do_tpv1@rediffmail.com

खाली 'A' प्रमाणे कार्यवाहीस्तव
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक,नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 203 दिनांक- 05.02.25
संबंधित अधि./कर्म.
न.र. 05/02/25
उ.स.न.र.

**प्रारुप नगर रचना योजना क्र.१**
**वडूज नगर पंचायत, जि. सातारा**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ८६ (१) (क) अन्वये मंजूर करणेबाबत.

**अधिसूचना क्र.:** क्र. प्रा.न.र.यो.क्र.१ /वडुज/ता. खटाव जि. सातारा/ कलम ८६(१)(क) / टिपीव्ही-१/४७५ , दि. २८.०१.२०२५.

**निर्णय** : सोबतची शासकीय अधिसूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावी.

(मसूदा मा. संचालकांनी मंजूर केला आहे.)

(अशोक कांबळे)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

**प्रति,**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करून त्याच्या १० प्रती या संचालनालयास, मुख्याधिकारी, नगर पंचायत, वडूज, जि. सातारा, सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे, व सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा यांना पाठवाव्यात.

**प्रत:**

१. मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (नवि १३), मंत्रालय, मुंबई ३२
२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
३. जिल्हाधिकारी, सातारा.

कृ.मा.प.

४. सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

/-सोबतच्या अधिसूचनेतील नगर रचना योजना क्र. १ वडुज बाबत नकाशांच्या प्रती मुख्याधिकारी, वडुज नगर पंचायत यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर, त्या अधिसूचनेप्रमाणेच असल्याची खातरजमा करुन सदर नकाशे विहित मार्गाने संचालनालयाकडे अधिप्रमाणित करण्यासाठी सत्वर सादर करावेत.

५. उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.

/- सदरहू अधिसूचना नगर रचना संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

६. सहायक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा

७. मुख्याधिकारी, वडूज नगर पंचायत, जि. सातारा

८. निवडनस्ती.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**

**तळमजला, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

**दूरध्वनी क्र.०२०-२६१२२०७६ Email ID:ddtp.ho@maharashtra.gov.in do_tpv1@rediffmail.com**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

## अधिसूचना

क्र. प्रा.न.र.यो.क्र.१ /वडुज/ता. खटाव जि. सातारा/ कलम ८६(१)(क)/ टिपीव्ही-१/४७५ दि. २८.०१.२०२५

ज्याअर्थी, वडूज नगर पंचायतीने त्यांचेकडील पत्र क्र. वनप/६१२/२०२४, दि२४.०७.२०२४ अन्वये मंजूरीसाठी सादर केलेली प्रारुप नगर रचना योजना (यापुढे जिचा दि. उल्लेख 'उक्त प्रारुप नगर रचना परियोजना 'असा करण्यात आला आहे.) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी त्यांना शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ उपकलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात उक्त अधिनियमाचे कलम ६८ उपकलम (२) अन्वये अधिसूचना क्र. वडूज नगर पंचायत/प्रा.न.र.यो.क्र.१/कलम ६८(२) मंजूरी/टिपीव्ही-१/४७१०, दि.२९.०८.२०२४ अन्वये मंजूर केली आहे;

आणि ज्याअर्थी, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अधिसूचना क्र. प्रा.न.र.यो.क्र.१ वडुज/ता. खटाव जि. सातारा/ कलम ७२(१)/लवाद/ टिपीव्ही-१/५१६०, दि.२५.०९.२०२४ अन्वये उक्त अधिनियमाचे कलम ७२ उपकलम (१) मधील तरतूदीनुसार व त्यांना शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१ उपकलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारात श्री. अनिल बा. पाटील, निवृत्त सहाय्यक संचालक, नगर रचना, यांची उक्त नगर रचना योजनेसाठी लवाद म्हणून नेमणूक केली आहे. यापुढे ज्याचा उल्लेख 'उक्त लवाद' असा करण्यात आला आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त लवाद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ७२ उपकलम (३) व (४) च्या तरतूदींमध्ये नमूद कार्यपध्दती नुसार प्रारुप नगर रचना योजनेस अनुसरुन प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज ची विहित नमुन्यात आखणी केली आहे;

आणि ज्या अर्थी, उक्त लवाद यांनी उक्त योजने संदर्भात उक्त अधिनियमाचे कलम ७२ उपकलम (३) व (४) चे तरतूदींनुसार आवश्यक ती वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज उक्त अधिनियमाचे कलम ७२ उपकलम (५) मधील तरतूदीनुसार पत्र क्र. न.र.यो.वडूज क्र.१/लवाद/८४, दि.०६.०१.२०२५ अन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे मंजूरी करीता सादर केली आहे (यापुढे जिचा उल्लेख 'उक्त प्राथमिक नगर रचना योजना 'असा करण्यात आला आहे);

आणि ज्या अर्थी, उक्त लवाद यांनी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे उक्त अधिनियमाचे कलम ७२ उपकलम (५) चे तरतूदीन्वये सादर केलेली उक्त प्राथमिक नगर रचना योजना, प्राप्त झालेच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या आत मंजूर करणे अथवा नामंजूर करणे बाबत संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्णय घेणे आवश्यक आहे;

आणि ज्या अर्थी, शासनाने दि.०१.१२.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार उक्त अधिनियमाच्या कलम ८६ उपकलम (१) (क) चे तरतूदीन्वये नगर पंचायत क्षेत्रातील प्राथमिक नगर रचना

योजना मंजूर करणेचे शासनाचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त अधिनियमाचे कलम १५१ उपकलम (१) चे तरतूदीन्वये प्रदान केलेले आहेत;

आणि ज्या अर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व विभागीय सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग यांचेशी सल्लामसलत केल्यानंतर, उक्त प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज यासोबत जोडलेल्या परिशिष्ट- १ मध्ये नमूद केल्यानुसार उक्त लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या बदलांसह मंजूर करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आता त्या अर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ८६ उपकलम (१) (क) चे तरतूदीन्वये प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करून संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणेः-

अ) प्राथमिक नगर रचना योजना क्र.१, वडूज यासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केल्यानुसार उक्त लवाद यांनी प्रस्तावित केलेल्या बदलांसह मंजूर करीत आहेत.

ब) उक्त मंजूर करण्यात आलेली प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज ची मंजूरीची सदर अधिसूचना वडूज नगर पंचायतीच्या कार्यालयामध्ये कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत आम जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

क) प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज च्या अधिप्रमाणित प्रती किंवा त्यातील संबंधित भागांच्या प्रती आम जनतेला अर्ज करून माफक दरात विक्रीसाठी वडूज नगर पंचायतीच्या कार्यालयामध्ये उपलब्ध ठेवण्यात येतील.

ड) उक्त मंजूर करण्यात आलेली प्राथमिक नगर रचना परियोजना क्र. १, वडूज व या योजनेव्दारे निर्माण झालेली दायित्वे ज्या दिनांकापासून अंमलात येतील ती तारीख दि. २८.०१.२०२५ अशी निश्चित करण्यात येत आहे.

इ) सदरची अधिसूचना खालील कार्यालयांमध्ये कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्याच्या कालावधीकरिता आम जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

i. लवाद, नगर रचना योजना, वडूज यांचे कार्यालय,
ii. सहसंचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे,
iii. सहाय्यक संचालक, नगर रचना, सातारा शाखा, सातारा.

ई) सदरची अधिसूचना ही संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पुणे, ४११००१.
दिनांकः २८.०१.२०२५.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे

## प्राथमिक नगर रचना योजना क्र. १, वडूज

(संचालनालयाचे पत्र क्र. प्रा.न.र.यो.क्र.१ /वडुज/ता. खटाव जि. सातारा/ कलम ८६(१)(क)/ टिपीव्ही-१/४७५ दि. २८.०१.२०२५ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | उक्त अधिनियमाचे कलम ६८ (२) चे तरतुदीन्वये मंजूर प्रारुप नगर रचना योजनेनुसार मू.भू.क्र./अं.भू.क्र. | उक्त अधिनियमाचे कलम ६८ (२) चे तरतुदीन्वये मंजूर प्रारुप नगर रचना योजनेनुसार प्रस्ताव/ तपशिल | लवाद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ७२ (५) चे तरतुदीन्वये प्रस्तावित केलेल्या प्राथमिक नगर रचना योजनेनुसार मू.भू.क्र./अं.भू.क्र | लवाद यांनी उक्त अधिनियमाचे कलम ७२ (५) चे तरतुदीन्वये प्रस्तावित केलेल्या प्राथमिक नगर रचना योजनेनुसार प्रस्ताव/ तपशिल | उक्त अधिनियमाचे कलम ८६ चे तरतुदीन्वये मंजूर फेरबदल |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मूळ भूखंड क्र.- ६१, ६२, ७०, ७१<br>अंतिम भूखंड क्र./ आ.क्र.- ९१ | खेळाचे मैदान (क्षेत्र ६३७४ चौ. मी.) | मूळ भूखंड क्र.- ७०, ७१<br>अंतिम भूखंड क्र./ आ.क्र.- ९१ | खेळाचे मैदान (क्षेत्र ६४०० चौ. मी.) या आरक्षणाच्या आकारमान व क्षेत्रामध्ये सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच, या फेरबदलाच्या अनुषंगाने लगतच्या भागातील रस्त्याच्या व अंतिम भूखंडांच्या नियोजनामध्ये सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करण्यात आला आहे. | लवाद यांनी प्रस्तावित केल्यानुसार मंजूर. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | २.१ | मूळ भूखंड क्र.- २८, २७, २९<br>अंतिम भूखंड क्र./ आ.क्र.- ७८ | अंतिम भूखंड क्र./ आ.क्र. ७८ (विक्री योग्य भूखंड क्र. १) | मूळ भूखंड क्र.- २८, २७, २९<br>अंतिम भूखंड क्र./ आ.क्र.- ७८ | अंतिम भूखंड क्र./ आ.क्र. ७८ (विक्री योग्य भूखंड क्र. १) च्या आकारमान व क्षेत्रामध्ये सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करण्यात आला आहे. | लवाद यांनी प्रस्तावित केल्यानुसार मंजूर. |
| | २.२ | मूळ भूखंड क्र.- १८, २८<br>अंतिम भूखंड क्र./ आ.क्र.- ७९ | अंतिम भूखंड क्र./ आ.क्र. ७९ (विक्री योग्य भूखंड क्र. २) | मूळ भूखंड क्र.- १८, २८, २९<br>अंतिम भूखंड क्र.- ५० | अंतिम भूखंड क्र./ आ.क्र. ७९ (विक्री योग्य भूखंड क्र. २) च्या आकारमान, क्षेत्र व स्थानामध्ये सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करण्यात आला आहे. | |
| | २.३ | मूळ भूखंड क्र.- ४३, ५०, ५१<br>अंतिम भूखंड क्र.- ५० | अंतिम भूखंड क्र. ५० | मूळ भूखंड क्र.- ४३, ५०, ५१<br>अंतिम भूखंड क्र. / आ.क्र.- ७९ | अंतिम भूखंड क्र. ५० च्या आकारमान, क्षेत्र व स्थानामध्ये सोबतच्या नकाशामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्तावित करण्यात आला आहे. | |

(अविनाश भा.पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**Government of Maharashtra**
**Directorate of Town Planning & Valuation,**
**Maharashtra State, Pune- 411 001**

**Ph. 020-26122076** **email:** ddtp.ho@maharashtra.gov.in
**Fax -020/26127041** **email:** do_tpv1@rediffmail.com

**Notification**

Maharashtra Regional & Town Planning Act, 1966

No.PreliminaryTPS No.1/Vaduj/Tal.Khatav.Dist Satara/Sec86 (1)(a)/TPV-1/४७ Dt. २८.01.2025.

Whereas, the draft Town Planning Scheme No. 1, Vaduj submitted by the Vaduj Nagar Panchayat vide its letter no.VNP/612/2024, dated 24.07.2024 (hereinafter referred to as "the said draft scheme") has been sanctioned by the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide Notification No. Draft TPS No.1/Vaduj/Tal. Khatav Dist. Satara/ Sec. 68(2)/TPV-1/4710/2024, dated 29.08.2024, under sub section (2) of the Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") said Act, as per the power delegated to them under the provisions of section 151(1) of the the said Act;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune vide Notification No.Draft TPS No.1/Vaduj/Tal.Khatav Dist. Satara/ Sec. 72(1)/TPV-1/5160/2024, dated 25.09.2024, issued under the provisions of sub-section (1) of Section 72 of the said Act, and as per the power delegated to them under the provisions of section 151(1) of the said Act, has appointed Shri. Anil B. Patil, Retired Assistant Director of Town Planning, as the Arbitrator in respect of the said draft Scheme (hereinafter referred to as "the said Arbitrator");

And whereas, **the said Arbitrator**, after following the prescribed procedure as required under the provisions of sub-section (3) and (4) of Section 72 of the said Act, has drawn up in the prescribed form, the **Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj** in accordance with the said sanctioned Draft Scheme;

And whereas, the said Arbitrator has submitted, the **Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj** under the provisions of sub-section (5) of Section 72 of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune for sanction vide letter No. TPS Vaduj No. 1/Arbitrator/84, dated 06.01.2025 (hereinafter referred to as 'the said draft Preliminary Town Planning Scheme');

And whereas, in accordance with the provisions of sub-section (1) (a) of Section 86 of the said Act, the said Preliminary Town Planning Scheme is required to be sanctioned within a period of two months from the date of receipt of the preliminary scheme from the Arbitrator under the provisions of section 72(5) of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department vide its Notification, No. TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 01.12.2016, has delegated the powers exercisable by it, under Section 86 (1) and (2) of the said Act, in respect of all Municipal Councils and Nagar Panchayats, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after making necessary enquiries and after consulting the Joint Director of Town Planning. Pune division, Pune

is of the opinion that it is necessary to sanction the said draft Preliminary Town Planning Scheme subject to the modifications as proposed by the said Arbitrator, more particularly mentioned in the Schedule 1 appended hereto;

Now, therefore, in exercise of the powers delegated to him under the provisions of sub-section (1) & (2) of Section 86 of the said Act, and all other powers enabling in this behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, hereby :-

a) sanctions the said Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj subject to the modifications as proposed by the said Arbitrator, more particularly mentioned in the Schedule- 1 appended hereto,

b) directs that this Notification and the said Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj as sanctioned shall be kept open for inspection by the public for a period of six months during office hours on all working days in the head office of the Vaduj Nagar Panchayat,

c) directs that the copies of the said Preliminary scheme or extracts therefrom certified to be correct shall be available for sale to the public on application at a reasonable price at the office of the Vaduj Nagar Panchayat, and

d) fixes 28.01.2025 to be the date on which all the liabilities created shall take effect and the said Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj as sanctioned shall come into force.

e) this notification shall also be available for inspection of general public during office hours on all working days for the period of one month in the following offices-

   i) Office of the Arbitrator, Town Planning Scheme No. 1, Vaduj.
   ii) Joint Director of the Town Planning, Pune Division, Pune.
   iii) Assistant Director of Town Planning, Satara Branch, Dist. Satara.

f) this Notification is made available on the www.dtp.maharashtra.gov.in website of Director of Town Planning, Maharashtra State, Pune.

Central Offices, Pune 411 001,
Dated:- 28.01.2025

**(Avinash B.Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune

**Schedule- 1**

**Preliminary Town Planning Scheme No. 1, Vaduj**

(Accompaniment to the Notification No. PreliminaryTPS No.1/Vaduj/Tal.Khatav.Dist Satara/Sec86 (1) (a)/TPV-1/475 Dt. 28.01.2025)

| Sr. No. | OP/FP No. as per sanctioned draft scheme under the provisions of section 68 (2) of the said Act | Proposals/ details as per draft scheme sanctioned under the provisions of section 68 (2) of the said Act | OP/FP No. as per preliminary scheme submitted by the Arbitrator under the provisions of section 72 (5) of the said Act | Proposals/ details as per the preliminary scheme submitted by the Arbitrator under the provisions of section 72 (5) of the said Act | Modification sanctioned under the provisions of section 86 of the said Act |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1. | Original Plot No.- 61, 62, 70, 71<br><br>Final Plot No./Res. No.- 91 | Playground (Area 6374 sq.m.) | Original Plot No.- 70, 71<br><br>Final Plot No./Res. No.- 91 | The size and area of reservation of Playground (area 6400 sq.m.) is proposed to be modified as shown on the map. And, in pursuance to this proposed modification, a change in the planning of road network and final plots in the adjoining area is proposed as shown on the map. | Sanctioned as proposed by the Arbitrator. |
| 2. | i. Original Plot No.- 28, 27, 29<br><br>Final Plot No./Res. No.- 78 | Final Plot no./Res. No.- 78 (Authority Sale Plot No. 1) | Original Plot No.- 28, 27, 29,<br><br>Final Plot No./Res. No.- 78 | The size and area of Final Plot No. /Res. No. - 78 (Authority Sale Plot No. 1) is proposed to be modified as shown on the map. | Sanctioned as proposed by the Arbitrator. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ii. | Original Plot No.- 18, 28<br>Final Plot No./ Res. No.- 79 | Final Plot No./ Res. No.- 79 (Authority Sale Plot No. 2) | Original Plot No.- 18, 28, 29<br>Final Plot No.- 50 | The size, area and location of Final Plot No./ Res. No. - 79 (Authority Sale Plot No. 2) is proposed to be modified as shown on the map. | |
| | iii. | Original Plot No.- 43, 50, 51<br>Final Plot No.- 50 | Final Plot No.- 50 | Original Plot No.- 43, 50, 51<br>Final Plot No./ Res. No.- 79 | The size, area and location of Final Plot No. 50 is proposed to be modified as shown on the map. | |

(Avinash B. Patil)
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.